Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-IV APR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# मानवी नात्यांचा व समाजाचा एक अन्वय : आगळ

**डॉ. आप्पा दत्तू माने**
मराठी विभाग प्रमुख
महात्मा फुले नूतन महाविद्यालय
मिरजगाव ता. कर्जत जि. अ.नगर

**प्रास्ताविक:**

महेंद्र कदम यांची आगळ ही कादंबरी आपले अस्तित्व दाखवून देणारी एक चांगली कादंबरी आहे. मानवी नात्यांचा आणि समाजाचा काही एक अन्वय असणारे कथानक म्हणुन आगळ कडे पाहिले जाते. आगळ ही महेंद्र कदम यांची लोकवाड:मय गृह मुंबई ने प्रकाशित केलेली एक उत्कृष्ट ग्रामीण कादंबरी आहे. एकीकडे गावाची नाळ सुटत नाही आणि दुसऱ्या बाजूने पोटापाण्यासाठी शहरात जाणे ही ज्या पिढीला अपरिहार्य असते. गाव टाकवत नाही आणि शहरी संसार सोडवत नाही अशा अवस्थेत असणाऱ्या तरूणांचे प्रतिनिधित्व या कादंबरीतील नायक करतो. या कादंबरीचे सामाजिक मूल्ये लक्षात घेऊन आगळ या कादंरीस बाबा पद्मनजी पुरस्कार प्रदान केला आहे.

**मानवी नात्यांचा व समाजाचा अन्वय : आगळ**

आगळ या कादंबरीचे कथानक मानवी नात्यांचा व समाजाचा अन्वय लावणारे आहे. या कादंबरीचा नायक हा मकरंद सराटे आहे.या कादंबरीमाध्ये तीन पिढ्यांचा संघर्ष आहे. या कादंबरीची सुरूवात भव्य अशा संयुक्त कुंटुबापासून कादंबरीच्या निवेदनाला सुरूवात केली आहे. परंतु कु टुंब कथेचे निभिड अरण्यात जाता-जात ही कादंबरी अत्यंत निमुळती अशी एका अग्रावर उभारलेली कुटुंब कथा होती. नायक मकरंद सराटे हा एका विना- अनुदानित महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कामाला लागतो. मकरंद चे वडील पारंपरिक संस्कृतीचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे सराटे कुटुंब संयुक्तपणे वावरत असते. हे संयुक्त कुटुंब फार काळ टिकून राहत नाही. घरात सूना येतात नंतर नातवंडे होतात त्यावेळी कुटुंब विभक्त होत जाते.

मकरंद सराटे हा एकत्र कुटूंबात वावरलेला असतो. त्यामुळे त्याची नाळ आपल्या कुटूंबाला जोडलेली असते. तो कौटुंबिक बांधिलकी जपणारा असतो त्याची पत्नी मात्र एकत्र कुटुंबात जूळवून घेत नाही कुटुंबात कलह व बेबनाव नको म्हणून तो नोकरीच्या ठिकाणी आपल्या बायकोसोबत राहू लागतो. यावेळी कनिष्ठ नोकरी उत्तम होते आणि उत्तम शेती कनिष्ठ होऊन इथेच कादंबरीच्या पांढरपेशा जगण्याला प्रतिष्ठा येते. शेतकऱ्याचे दारिद्र तसेच राहते. कथानकातील तिसऱ्या पिढीतील पहिल्या संघर्षाला सुरूवात होते. नोकरीवाल्याने कुटूंबाचा गाडा ओढायचा असतो हे मकरंदच्या वडींलांची समज आणि नोकरीवाल्यांनी स्वत:चेच पाहयचे ही मकरंदच्या पत्नीची (नीलाची) समज असते. मकरंदची मात्र गाव आणि घर अशी दोन्हीकडे ओढ असते.

कादंबरीतील तिसरा संघर्ष नव्या जीवन जगण्याचा आहे. मकदिं ची मुलगी पुण्यासारख्या शहरात शिकत असते. याची चिंता मकरंदला असते. ही मुलगी म्हणजे वाड्याची आगळ न पाहिलेली मुलगी असते. जगण्याच्या नव्या जाणिवा स्वीकारणारी ही मुलगी मकरंद आणि नीलू यांच्याशी

संघर्षाला सुरूवात करणारी ठरते म्हणजेच हा संघर्षाचा तिसरा बिंदू होय. एकंदरीत आजी-सूना पहिला संघर्ष, वडील- मुलगा हा दुसरा संघर्ष आणि जगण्याच्या जाणिवेचा आणि जीवनशैलीचा तिसरा संघर्ष असा आहे. अगळ मधील कुटुंबात नातेसंबंधाच्या घराला बांधून ठेवणारा वर्तनाचा अनिर्बंध करार दिसून येतो.

या कादंबरी मनोविश्लेषणाला बराच वाव आहे. नायकाशी त्याची पत्नी बोलताना तिच्या मनाचे विविध पदर उलघडत जातात. तिच्या एकंदरीत कादंबरीतील संवादातून तिचा ग्रमीण जीवनाविषयीचा दृष्टिकोन उलगडत जातो. कुटुंबव्यवस्थेविषयीचे तिचे समज सतत जाणवत राहतात. तिच्या मनातील स्वकेंद्रीतता जागो-जागी दिसून येते. मकंरद सराटे हा मात्र गाव आणि शहर यांचा अन्वय लावणारा नायक आहे. याची प्रचिती त्याच्या संवादातून जाणवत राहते. गावाची नाळ टिकवण्यासाठी तो शिक्षणासाठी आपल्या भावाच्या मुलाला घेऊन येतो. ही बाब त्याच्या कुटूंबात व पती- पत्नीच्या नात्यात कलह निर्माण करणारी ठरते. त्यामुळे मकरंदच्या पत्नीचा आपल्या पतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक बनतो. यातून पती-पत्नीमध्ये कलह निर्माण होतो. मकरंदला सतत वाटत असते की, आपल्या मुलींने मोठ्या चुलत भावाशी सामंजश्याने वागावे त्याला मान-सन्मान द्यावा या उलट त्याच्या पत्नीची भूमिका बनते तिला आर्थिक निकषावर व शहरीपणामुळे आपल्या मुलीचे महत्व जास्त वाटते. एकंदरीतच मनोविश्लेषणाचा विचार करता तीन पिढ्यातील व्यक्तीचे मनोविश्लेषण आपणाला आगळ कांदबरीतून संवादाच्या आधारे करता येते.

कुटुंब संस्थेत नात्याचा वीण अत्यंत घट्ट आणि तितकाचा नाजूक असतो. तो पिळ या कादंबरीत हळूहळू ढिला होत जातो व कुटुंबातील नात्यांना तडा जातांना दिसतो. नायक यावेळी नात्याविषयी हळहळ व्यक्त करताना दिसतो. उत्तम सामाजिकता ही कादंबरीचे अंगभूत वैशिष्ट असते. आगळ ही एका कुटूंबाची कथा असली तरी एका कुटूंब व्यवस्थेची कुचंबना व्यामिश्र व संयत रुपात मांडली गेल्याने एक वेगळी सामाजिकता व्यक्त झालेली दिसून येते. मकरंद सराटे हा एक समंजस्य नायक ठरतो. आपल्या पत्नीबरोबर संवाद साधताना विसंवाद होईल असे वाटल्यास तो नर्म विनोदाने प्रसंगाला सामारे जातो. तो आपल्या पत्नीचा संताप आला तरी तिच्यावर खेकसत नाही. कारण तो गावाकडील कुटूंब व्यवस्थेचे नियम पाळणारा आहे. सामाजिक भान जपणारा आहे. त्यामुळे आगळ ही कादंबरी कुटूंब व्यवस्थेतील पती- पत्नीतील महत्व विशद करणारी आहे तसेच पती-पत्नीच्या वेगळ्या नात्यावर प्रकाश टाकणारी कादंबरी ठरते.

मकरंद सराटे हा समंजस नायक असतो. गाव संस्कृती जपणारा असतो. दोन पिढ्या एकत्र करण्याचा प्रयत्न करणारा नायक असतो. तो गावी गेल्यास आई व वडील यांच्याशी आदबीने संवाद साधतो. भाऊ, भावजय, पुतण्या यांच्याशी शेवटच्या प्रसंगात संवाद साधणारा मकरंद पाहिला म्हणजे कादंबरीकार कसोटीला उतरतो आहे. याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. तो आपले बोलणे खंडीत न करता त्या सर्वांशी प्रभावी संवाद साधतो. तो स्वत: हतबल झालेला असतो. तो स्वत:चा षंड म्हणूनही उपहास करतो.

या कादंबरीत नोकरी करणारी स्त्री व नोकरी न करता घरात, शेतात मोलमजुरी करणारी स्त्रीही आहे. नीला ही नोकरी न करणारी स्त्री असते. परंतु मकरंदशी संघर्षाला पेव फोडते. नायक हा आपल्या पत्नीची बाजू घेतो आहे असे मकरंदच्या वडीलांना सतत वाटत राहते. त्यामुळे वडील मुलगा संघर्ष सुरू होतो. या कादंबरीत जातवाद हा विषयही कदमांनी अत्यंत परखडपणे हाताळला आहे. भारतीय समाजात जात-वाद हा सनातन वास्तव आहे जात-वाद हा अति भयावह आहे. या कादंबरीत अत्यंत तीक्ष्ण बुध्दीची प्राध्यापिका दातेबाई एक ब्राम्हण म्हणून येते. अख्खा स्टाफ तिच्याकडे पूर्वग्रहाने

पाहतो. परंतु ती तिचे वेगळे ब्राम्हण कौशल्य वापरल्याशिवाय राहत नाही. एखाद्या समाजाला जाणिवपुर्वक वक्रदृष्टीने पाहणे हे निकोप समाजसुधारण्यासाठी घातक असते. हा विषय कदमांनी अत्यंत जबाबदारीने पेलला आहे.

आगळ च्या आत्मनिवेदनाला लय आहे. कादंबरीकार नायकाला कधी लोककथानकाच्या भूमिकेत नेतो. तर कधी शिक्षकाच्या भूमिकेत ठेवताना दिसून येतो त्यामुळे आगळ या शीर्षकाची समर्पकता दिसते. आगळ ही पुर्वीच्या वाड्यांना असते. वाडयाची बांधिलकी टिकविण्याचे काम आगळ करते. तसेच कादंबरीकार कथानकाच्या निवेदनासाठी लोककथेची झालर लावताना दिसते. एरवी कादंबरीकार नायकाला सामान्य पातळीवर ठेवताना दिसतो. कादंबरीत नव्या पिढीच्या भाषेचा प्रयोग केला आहे. पण तो फसला आहे. एकाच वेळी शुध्द व इंग्लिश अशी नव्या पिढीची भाषा आहे. इंग्लिश, मराठी आणि शुध्द इंग्लिश पण नव्या पिढीचा विचार, राहणीमान, कपडालत्ता, खाणे-पिणे, जीवनाकडे पाहण्याची बेदरकार वृत्ती हे विषय फार सुंदरपणे मांडले आहेत. नायक बायकोचे गाऱ्हाणे चार पानात सांगतो, पण वेगवेगळ्या प्रकारात ते खंडीत करून सांगतो. कांदबरीचा शेवट नवऱ्याच्या नंदीबैल झाल्याचे दाखवून हा बैल आपल्या पुतण्याला जीवन विषयक काही कानमंत्र देतो. आगळ ही खेड्यातून शहरात गेलेल्याची कथा नाही कुटूंबव्यवस्थेच्या निर्माण झालेल्या प्रश्नाची कादबंरी ठरते.

**समारोप :**

एकंदरीत महेंद्र कदम यांची आगळ ही कादंबरी आजच्या वास्तवात अत्यंत वेगळी ठरताना दिसते. आजची समाजस्थिती अत्यंत गुतांगुतीची झालेली आहे अशा व्यापक गुतांगुतीच्या समाजातील ढासळती मूल्ये शोधणे अत्यंत कठीण काम आहे. ही मूल्ये शोधण्याचा यशस्वी प्रयत्न आगळ या कादबंरीने केलेला दिसून येतो.

भारत देशाने आपले वेगळेपण जगात ज्या घटकांच्या आधारे टिकविले ते सांस्कृतिक घटक म्हणजे कुटुंबसंस्था आणि कृषिसंस्था हे होय. यामध्ये मानवी बांधिलकी टिकविणारा घटक, समुहभावना जपणारा घटक म्हणजे कुटुंबव्यवस्था आहे. यावरच कदमांनी आगळच्या माध्यमातुन चर्चा केलेली आहे. कुटूंब व्यवस्थेत सर्वात महत्वाचा धागा पती-पत्नीचा असतो. आगळमध्ये पती-पत्नीचे अनंत पदर जाणवताना दिसतात. पती-पत्नीच्या वृत्ती-प्रवृत्तीवर स्वतंत्र अभ्यास करावा अशी आगळ ही कादबंरी आहे. एकंदरीत ढासळती मूल्ये व्यवस्था जपण्याचा यशस्वी प्रयत्न आगळ ने केलेला दिसून येतो.

**संदर्भ:**

१. आगळ- महेंद्र कदम
२. साहित्य आणि सामाजिक संदर्भ- रा.ग. जाधव
३. साहित्य आणि सामाजिक संदर्भ- अंजली सोमण